जनसामान्यांची महाशक्ती
नवशक्ति
मुंबई सिटी
Reg.No.MH/MR/South-104/2012-14 RNI No. 1691/57
शुक्रवार, ३० मार्च २०१२

# जेजेटी विद्यापीठाचा ६ एप्रिलला दीक्षांत समारंभ

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) - झुंझुन येथील जगदीशप्रसाद झाबरमल टीबडेवाला विद्यापीठाची संचालक संस्थापक संस्था असलेल्या राजस्थानी सेवा संघाला नुकतीच ५० वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त येत्या ६ एप्रिलला मुंबईतील भाईदास सभागृहात येथे विविध समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी खास विद्यापीठाच्या दीक्षांत समारभांचे आयोजन करण्यात आले असून यावेळी राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष विनोद टीबडेवाला आणि सुप्रसिद्ध लेखक सांवरमल सांगानेरिया यांनी डी.लिट पदवी देण्यात येणार आहे. राज्यपाल के. शंकरनारायण हे या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

तीन सत्रांमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमाला राज्यपालांसह, अनेक मंत्री, लेखक, शिक्षक आणि पत्रकार मंडळी उपस्थिती राहणार असल्याची माहिती संघातर्फे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. सकाळी ९ वाजता या कार्यक्रमाला सुरुवात होणार असून पहिला सत्रात संताना सन्मानित करण्यात येणार आहे. तर दुपारी १ वाजता दुसऱ्या सत्राला सुरुवात होणार असल्याचीही यावेळी सांगण्यात आ ले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने उद्योग क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या अनेक जणांना यावेळी सन्मानित करण्यात येणार आहे. यावेळी राजस्थानी सेवा संघाचे गौरवशाली इतिहास नृत्य नाटिकेच्या रूपात सादर केला जाणार आहे. राजस्थान तसेच महाराष्ट्राची सांस्कृतिक समानता आणि एकतेचे सूत्र गुंफून दुसरी नृत्य नाटिका सादर करण्यात येणार असून ती या सत्राचे विशेष आकर्षण ठरणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात येत आहे.